RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक–नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - ११, अंक - २ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १३ - १९, २०२२ / पौष २३ - २९, शके १९४३ [ पृष्ठे १८

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय / संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

**सदस्य-सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगररचना यांजकडून**

**नगर विकास विभाग**

**सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक**

**अधिसूचना**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये**

क्रमांक नावि/प्र.छा.स./प्रा.यो. नाशिक/कलम २० *(४)*/मौजे तिरडशेत, ता. नाशिक/ गट नंबर २१/१ व २१/२/१५१३/सन २०२१.– ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्यास ''उक्त अधिनियम'' असे संबोधले आहे) मधील तरतुदींनुसार नाशिक जिल्ह्याची सुधारित प्रादेशिक योजना (यापुढे ज्यास ''उक्त प्रादेशिक योजना'' असे संबोधले आहे) शासनाने दिनांक २१ जून २०१३ रोजी मंजूर केली असून ती दिनांक १६ सप्टेंबर २०१३ पासून अंमलात आलेली आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे तिरडशेत, तालुका नाशिक, जिल्हा नाशिक येथील गट नंबर २१/१ व २१/२, क्षेत्र ७.१९ हेक्टर ह्या जमिनी (यापुढे ज्यास ''उक्त जमीन'' असे संबोधले आहे) ''शेती विभागात'' समाविष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीचा वापर विभाग बदलून, ''शेती विभाग'' ऐवजी ''रहिवास विभाग'' असा बदल करणे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाल्याने, उक्त अधिनियमाचे कलम २०, पोट-कलम *(२)* मधील तरतुदींनुसार उक्त जमीन खालील अटींच्या अधीन राहून, ''रहिवास विभागात'' समाविष्ट करण्याकरिता उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक होते (यापुढे ज्यास ''प्रस्तावित फेरबदल'' असे संबोधले आहे) ;

(१) उक्त परिघक्षेत्र नकाशातील रहिवास वापरासाठी प्रस्तावित केलेल्या जागेच्या रेखांकनात, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडावयाच्या १५ टक्के सक्तीच्या खुल्या जागेव्यतिरिक्त १० टक्के जागा सुविधांसाठी (Amenity Space) राखून ठेवणे बंधनकारक राहील.

(२) उक्त सुविधा क्षेत्राचा कोणताही प्रकारचा मोबदला (रोख/टिडीआर/एफएसआय) मिळणार नाही.

(३) उक्त सुविधा क्षेत्रामध्ये जिल्हाधिकारी, नाशिक सुचवितील त्याप्रमाणे सुविधांचे विकसन/बांधकाम करण्यात यावे.

(४) प्रस्तुत परिघक्षेत्र नकाशातील जागेसाठी शुद्ध व पुरेशा प्रमाणातील पाणीपुरवठा तसेच मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प इत्यादी पायाभूत सुविधा अर्जदार / विकासकाने स्वखर्चाने उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे व त्या तशा केल्या आहेत याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी खात्री करावी.

(५) जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर उपरोक्त मूलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधांचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारांवर अभिन्यासातील भूखंड विक्रीवर बंधन खालीलप्रमाणे राहील. जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.

**तक्ता**

**अभिन्यासातील भूखंड / सदनिका यांची सुविधांच्या विकसनाशी सांगड**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमत: मंजूर झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण २५ टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण ५० टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण ७५ टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण ९० टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १०० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण १०० टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

(६) नाशिक प्रादेशिक योजनेतील क्षेत्रांचा वापर विभाग बदलताना अधिमूल्य व इतर शुल्क आकारण्याचा दिनांक ६ मे २०१५, दिनांक ११ जून २०१५ तसेच दिनांक ४ जानेवारी २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार अधिमूल्य उक्त क्षेत्राचा वापर लागू राहील व जमीनमालकास आवश्यक प्रक्रिया शुल्क, प्रसिद्धी शुल्क, अधिमूल्य भरणे बंधनकारक राहील.

(७) जर अभिन्यासात समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल, तर जागेत सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

वरीलबाबत उल्लंघन झाल्यास रेखांकन मंजुरी व अकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम *(३)* च्या तरतुदींनुसार शासन नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१११४/१६०/प्र.क्र. १०१/२०१४/नवि-९, दिनांक १८ फेब्रुवारी २०१६ अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत सर्व नागरिकांकडून विहित मुदतीत सूचना/हरकती दाखल करणाऱ्यांना सुनावणी देण्याकरिता व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांना "अधिकारी" म्हणून प्राधिकृत करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी करावया लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र. क्र. ४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत (यापुढे ज्यास "उक्त शासन निर्णय" असे संबोधले आहे) व त्या अनुषंगाने शासनाने "प्रस्ताव छाननी समिती" गठीत केली आहे ;

आणि ज्याअर्थी, शासनाने यापूर्वी मंजूर प्रादेशिक योजनेतील वापर विभाग बदलासाठी प्रसिद्ध केलेल्या कलम २० *(३)* च्या प्रस्तावात देखील "उक्त शासन निर्णयानुसार" कार्यवाही होणे अपेक्षित असल्याने शासनाने क्रमांक टीपीएस-१८१५/प्र.क्र. ४९/१५/भाग-१/नवि-१३, दिनांक ९ जून २०१५ अन्वये कार्यपद्धती निश्चित करून दिलेली आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र. क्र. ४९/१५/नवि-१३, दिनांक ११ जून २०१५ नुसार कलम २० *(२)*, २० *(३)* व २० *(४)* खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगररचना यांना प्रदान केलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी तथा सहसंचालक, नगररचना, नाशिक यांनी वैधानिक कार्यवाही पूर्ण करून त्यांचा अहवाल प्रस्ताव छाननी समिती यांचेकडे सादर केला आहे. तसेच प्रस्ताव छाननी समितीच्या दिनांक २२ फेब्रुवारी २०१८ रोजीच्या बैठकीत अर्जदार यांनी अधिमूल्य रक्कम जमा केल्यानंतर कलम २० *(४)* ची अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार अर्जदार यांनी अधिमूल्य रकमेचा भरणा केला आहे ;

आता त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या उक्त अधिकारांनुसार उक्त अधिनियमाच्या कलम २०, पोट-कलम *(४)* अन्वये उक्त फेरबदलास पुढीलप्रमाणे मंजुरी देत आहे व त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीची दिनांक २१ जून २०१३ रोजीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

नाशिक जिल्ह्याच्या मंजूर सुधारित प्रादेशिक योजनेतील मौजे तिरडशेत, तालुका नाशिक, जिल्हा नाशिक येथील गट नंबर २१/१ व २१/२, क्षेत्र ७.१९ हेक्टर जमिनीचा वापर सोबतच्या भाग नकाशात दर्शविल्यानुसार खालील अटींच्या अधीन राहून "शेती विभाग" ऐवजी "रहिवास विभाग" असा बदलण्यात येत आहे.

**अटी :**

(१) उक्त परिघक्षेत्र नकाशातील रहिवास वापरासाठी प्रस्तावित केलेल्या जागेच्या रेखांकनात, प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीनुसार सोडावयाच्या १५ टक्के सक्तीच्या खुल्या जागेव्यतिरिक्त १० टक्के जागा सुविधांसाठी (Amenity Space) राखून ठेवणे बंधनकारक राहील.

(२) उक्त सुविधा क्षेत्राचा कोणताही प्रकारचा मोबदला (रोख/टिडीआर/एफएसआय) मिळणार नाही.

(३) उक्त सुविधा क्षेत्रामध्ये महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण सुचवितील त्याप्रमाणे सुविधांचे विकसन/बांधकाम करण्यात यावे.

(४) प्रस्तुत परिघक्षेत्र नकाशातील जागेसाठी शुद्ध व पुरेशा प्रमाणातील पाणीपुरवठा तसेच मलनि:सारण, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी पुनर्प्रक्रिया प्रकल्प इत्यादी पायाभूत सुविधा अर्जदार / विकासकाने स्वखर्चाने उपलब्ध करून घेणे आवश्यक आहे व त्या तशा केल्या आहेत याबाबत महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी खात्री करावी.

(५) जर अभिन्यासात भूखंड पाडून विक्री करणे प्रस्तावित असेल तर उपरोक्त मूलभूत सुविधांचा विकास क्रमाने करताना एकूण अपेक्षित सुविधांचा विकास टप्प्याने होत असताना अर्जदारांवर अभिन्यासातील भूखंड विक्रीवर बंधन खालीलप्रमाणे राहील. महानगर आयुक्त, नाशिक महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सदर बाबींवर नियंत्रण ठेवावे.

**तक्ता**

**अभिन्यासातील भूखंड / सदनिका यांची सुविधांच्या विकसनाशी सांगड**

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | अभिन्यास अंतिमत: मंजूर झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण २५ टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ब) | सुमारे ४० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण ५० टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (क) | सुमारे ६० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण ७५ टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (ड) | सुमारे ८० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण ९० टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |
| (इ) | सुमारे १०० टक्के मूलभूत सुविधा पूर्ण झाल्यावर | .. | मंजूर भूखंडापैकी एकूण १०० टक्के भूखंड / सदनिका विक्री अनुज्ञेय राहील. |

(६) जर अभिन्यासात समूह गृहबांधणी योजना विकसित करावयाची असेल, तर जागेत सर्व मूलभूत सुविधा विकसित झाल्याशिवाय भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

(७) शासन निर्णय दिनांक ४ जानेवारी २०१६ व त्यासोबतच्या सहपत्रात नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सदर जमिनींचा विकास करणे बंधनकारक राहील.

(८) विषयाधीन जमिनींवर अर्जदार / विकसनकर्ते यांनी विकसन करताना प्रती हेक्टरी २५० वृक्ष लावणे बंधनकारक राहील. तसेच विकसित रेखांकनातील भूखंडधारकाने भूखंडात ५ वृक्ष लावणे बंधनकारक राहील. सदरची बाब विकसनास अंतिम मंजुरी देताना पडताळणी करण्यात यावी.

(९) सदरची परवानगी म्हणजे मालकीहक्काबाबत प्रमाणीकरण नाही. फेरबदल प्रस्तावाखालील जमिनींच्या मालकीहक्काबाबत सर्वस्वी अर्जदार यांची जबाबदारी राहील.

(१०) विषयांकित जमिनींमध्ये विकसन करण्यापूर्वी सदर जमिनी वनसंज्ञेमध्ये येत नाहीत, याबाबत वन विभागाकडून 'ना-हरकत दाखला' घेणे आवश्यक राहील.

(११) जास्त तीव्र उताराखालील (१ : ५ पेक्षा जास्त उताराखालील) व बांधकाम योग्य नसलेल्या क्षेत्रामध्ये कोणत्याही स्वरूपाचे विकसन अनुज्ञेय होणार नाही. त्याचप्रमाणे प्रस्तावाखालील जागेचे विकसन करताना क्षेत्रांतर्गत जागेची नैसर्गिक भूपृष्ठीय रचना, कंटूर याबाबी विचारात घेऊन अभिन्यासाची व त्या अंतर्गत रस्त्यांची आखणी नियोजित करणे आवश्यक राहील.

(१२) प्रस्तावाखालील क्षेत्रालगतच्या जमिनींसाठी पोच रस्ता उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

वरीलबाबत उल्लंघन झाल्यास रेखांकन मंजुरी व अकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयांत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

(१) जिल्हाधिकारी, नाशिक.

(२) सहायक संचालक, नगररचना, नाशिक शाखा, नाशिक.

प्रस्तुत सूचना **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सुलेखा वैजापूरकर,**
सदस्य-सचिव,
प्रस्ताव छाननी समिती तथा
सहसंचालक, नगररचना,
नाशिक विभाग, नाशिक.

नाशिक, ३० डिसेंबर २०२१.

---

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

### Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik

*The Maharashtra Regional and Town Planning Act, 1966*

No. NKDN/P.S.C./R.P. Nashik/Section 20 *(4)*/Mouje Tiradshet, Tal. Nashik/Gat No. 21/1 and 21/2/ 1513/2021.– Whereas, the Government has sanctioned the Revised Regional Plan for Nashik district on dated 21st June 2013 (hereinafter referred to as " the said Regional Plan") under the provisions of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as " the said Act") and has came into force with effect from 16th September 2013 ;

and whereas, in the said Regional Plan, the land bearing Gat No. 21/1 and 21/2 admeasuring about 7.19 hectare of Mouze Tiradshet, taluka Nashik, district Nashik (hereinafter referred to as " the said land") is included in "Agriculture Zone;"

and whereas, the Government is of the opinion that it is necessary to change the zoning of the said land from "Agriculture Zone" to "Residential Zone" and to modify the said Regional Plan accordingly as per the provisions of sub-section *(2)* of Section 20 of the said Act, so as to include the said lands is "Residential Zone" subject to the following conditions (hereinafter referred to as " the said Modification").

(1) In the layout of the land proposed for residential user within the said peripheral plan 10 per cent area shall be kept as Amenity Space in addition to the compulsary 15 per cent space to be kept as per prevailing Development Contorl Regulations.

(2) Regarding such amenity space no compensation of any kind will be given.

(3) In the amenity space development/construction of amenity shall be made as suggsted by the Collector, Nahsik.

(4) All the necessary basic infrastructure such as potable and sufficient water supply, sewerage, solid waste management, waste water treatment plant etc. required for the development of the said land under modification shall be made available by the land owner at his own cost, subject to satisfaction of Collector, Nashik.

(5) If the land is proposed to be developed by way of plotted layout then sale of plots under such layout shall be monitored by Collector, Nashik in relation to development of civic amenities as per the stages given below :

| | | | |
|---|---|---|---|
| *(a)* | After sanction final approval layout | .. | Sale of 25 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(b)* | After completion of 40 per cent of Civic Amenities. | .. | Sale of 50 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(c)* | After completion of 60 per cent of Civic Amenities. | .. | Sale of 75 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(d)* | After completion of 80 per cent of Civic Amenities. | .. | Sale of 90 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(e)* | After completion of 100 per cent of Civic Amenities. | .. | Sale of 100 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |

(6) Government has issued Resolution dated 6th May 2015, dated 11th June 2015 and dated 4th January 2016 regarding the levy of Premium, Processing Fee and Publications Charges for change of user of the lands in the Nashik Regional Plan, premium of this Resolution shall be applicable for the change of user of the said Land and it shall be binding on the land owner to pay the premium and the fees etc.

(7) If the Group Housing Scheme is proposed in the layout then, Occupancy Certificate shall not be issued unless all basic amenities are fully developed in the said land ;

In case of Non-Compliance, Layout Approval and Non-Agricultural Permission shall liable to be cancelled.

and whereas, in accordance with the provisions of sub-section *(3)* of Section 20 of the said Act, Urban Development Department *vide* Notice No. TPS-1114/160/CR-101/2014/UD-9, dated 18th February 2016 has published, the Notice regarding the Proposed Modification and Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik was Appointed as the officer to hear the suggestions/objections received in this regards within the stipulated period and submit his report to the Government ;

and whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815/CR-49/15/UD-13, dated 6th May 2015 and dated 4th January 2016 (hereinafter referred to as "the said Government Resolution") has issued the directives under Section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of Sanctioned Regional Plans, and for that purpose constituted "Proposal Scrutiny Committee;"

and whereas, the Government *vide* its Order No. TPS-1815/CR-49/15/Part-1/UD-13, dated 9th June 2015 has instructed to follow the due process as stipulated in the "said Government Resolution" in the zone change proposal wherein the Government has already published Notice under Section 20 *(3)* for change of zone in sanctioned Regional Plan ;

and whereas, as per the provision of sub-section *(1)* of Section 151 of the said Act, Government *vide* Notification No.TPS-1815/CR-49/15/UD-13, dated 11th June 2015 has delegated the powers under Sections 20 *(2)*, 20 *(3)* and 20 *(4)* of the said Act to the concerned Joint Director of Town Planning ;

and whereas, the Appointed Officer has submitted his report to the Member-Secretary also the Proposal Scrutiny Committee, in the meeting, dated 22nd February 2018 accorded approval to this proposal and directed Member-Secretary to issue the Final Notification according to sub-section *(4)* of Section 20, after payment of the premium by the Applicant. Accordingly, the Applicant has deposited the premium amount.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section *(4)* of Section 20 of the said Act, hereby sanctions the said Modification and for that purpose amends the aforesaid Notification, dated 21st June 2013 as follows.

In the said Regional Plan, the following new Entry shall be added after the last Entry of the Schedule of Modifications.

**ENTRY**

In the Sanctioned Revised Regional Plan of Nashik district the allocation of the land bearing Gat Nos. 21/1 and 21/2 admeasuring about 7.19 hectare of mouje Tiradshet, taluka Nashik, district Nashik is changed from "Agriculture Zone" to "Residential Zone" as shown on the Plan, subject to the following conditions.

**Conditions :**

(1) In the layout of the land proposed for residential user within the said peripheral plan 10 per cent area shall be kept as Amenity Space in addition to the compulsary 15 per cent open space to be kept as per prevailing Development Contorl Regulations.

(2) Regarding such amenity space no compensation of any kind will be given.

(3) In the amenity space development/construction of amenity shall be made as suggsted by the Metropolitan Commissioner, Nashik Metropolitan Region Development Authority.

(4) All the necessary basic infrastructure such as potable and sufficient water supply, sewerage, solid waste management, waste water treatment plant etc. required for the development of the said land under modification shall be made available by the land owner at his own cost, subject to satisfaction of Metropolitan Commissioner, Nashik Metropolitan Region Development Authority.

(5) If the land is proposed to be developed by way of plotted layout then sale of plots under such layout shall be monitored by Metropolitan Commissioner, Nashik Metropolitan Region Development Authority in relation to development of civic amenities as per the stages given follow :

***Table***

**Corelation of layout Plots / Flats with development of basic infrastructure**

| | | | |
|---|---|---|---|
| *(a)* | After sanction final layout | .. | Sale of 25 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(b)* | After approximate 40 per cent development of basic infrastructure. | .. | Sale of 50 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(c)* | After approximate 60 per cent development of basic infrastructure. | .. | Sale of 75 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(d)* | After approximate 80 per cent development of basic infrastructure. | .. | Sale of 90 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |
| *(e)* | After approximate 100 per cent development of basic infrastructure. | .. | Sale of 100 per cent of the total Plots / Flats shall be permissible. |

(6) If the Group Housing Scheme is proposed in the layout then, Occupancy Certificate shall not be issued unless all basic amenities are fully developed in the said land ;

(7) It shall be binding to develop the said land as per the guidelines mentioned in said Government Resolution dated 4th January 2016 and Annexure with it.

(8) It shall be binding on Applicant / Developer to plant 250 trees per hectare, while developing the land and plot holder of sanctioned layout to plant 5 trees per plot. This shall be verified at the time of final sanction to development.

(9) This permission does not confirm ownership of the said land. The Applicant will be completely responsible regarding any issue about ownership of the said land.

(10) It shall be binding to get "No-Objection Certificate" from the Forest Department prior to development of the said land.

(11) No Development will be permissible in the land having steep slope more than 1 : 5 and in land which is not suitable for construction. The development of land regarding the internal roads is to be done according to natural geology of the land contour.

(12) It shall be necessary to provide access road to adjacent land to adjacent lands.

In case of Non-Compliance, Layout Approval and Non-Agricultural Permission shall liable to be cancelled.

The Part Plan showing the abovesaid Sanctioned Modification shall be kept open for information of general public during Office hours on all working days at the following Offices –

(1) The Collector, Nashik.

(2) The Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik.

This Notice is also be available on website **www.dtp.maharashtra.gov.in**

**SULEKHA VAIJAPURKAR,**
Member- Secretary,
Proposal Scrutiny Committee and
Joint Director of Town Planning,
Nashik Division, Nashik.

Nashik, 3th December 2020.

## जिल्हाधिकारी यांजकडून

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये.**

**अधिसूचना**

**जिल्हा नाशिक**

क्रमांक भूसं/कक्ष-१०/३/कावि-११२२/२०२१.— ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून अधिसूचना क्रमांक -- लागू नाही. प्रकरणास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये प्रारंभिक अधिसूचना क्रमांक टीपीएस-११९३/२१२४/सीआर-३५/८८/युडी-९, दिनांक २८ जून १९९३ रोजी काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची " एक " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची " दोन " मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, नाशिक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनी कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल, (कोणताही असल्यास) विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्यांची खात्री पटली आहे ; आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १२६ नुसार उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची " तीन " मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी " पुनर्वसाहत क्षेत्र " म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची " चार " मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन**

**जिल्हा नाशिक, तालुका नाशिक, मौजे वडाळा**

**प्रकरण क्रमांक १/२०२०**

| सर्व्हे नंबर/ गट नंबर | | अंदाजित क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ. मी. |
| ९७/११/१३/१५ (प्लॉट नंबर ८) (३६२७ पै.) | .. | २००५.०० |
| **एकूण क्षेत्र ..** | | **२००५.००** |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : आरक्षण क्रमांक ३६५ म्युनिसिपल मार्केटकरिता.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : आरक्षण क्रमांक ३६५ म्युनिसिपल मार्केटकरिता.

**समाजाला होणारे लाभ** : सार्वजनिक प्रयोजनासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध होईल.

**अनुसूची - तीन**

**पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन** : लागू नाही.

**अनुसूची - चार**

**पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश** : लागू नाही.

**टीप**.- उक्त जमिनीचा नकाशा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांच्या कार्यालयात निरीक्षण करता येऊ शकेल.

**सूरज मांढरे,**
जिल्हाधिकारी, नाशिक.

नाशिक, २९ डिसेंबर २०२१.

**भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ नुसार प्राथमिक अधिसूचना.**

**जिल्हा नाशिक**

क्रमांक भूसं/कक्ष-१०/३/कावि-११२३/सन २०२१.— ज्याअर्थी, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) याच्या कलम ३ च्या खंड *(इ)* च्या परंतुकाद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग क्रमांक संकीर्ण-११/२०१४/प्र. क्र. ७७/अ-२, दिनांक १९ जानेवारी २०१५ (यात यापुढे जिचा निर्देश "उक्त अधिसूचना" असा करण्यात आला आहे) याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(झेड-ए)* मध्ये व्याख्या केलेल्या एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी, एखाद्या जिल्ह्यातील ५०० हेक्टरपेक्षा अधिक नसेल इतक्या क्षेत्राकरिता जमीन संपादन करण्याच्या संबंधात, अशा जिल्ह्याचा जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी समुचित शासन असल्याचे मानण्यात येईल ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसूचनेनुसार समुचित शासन असलेल्या नाशिक जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांस यासोबत जोडलेल्या अनुसूची-एकमध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेली जमीन (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी (यापुढे ज्याचा निर्देश "उक्त सार्वजनिक प्रयोजन" असा करण्यात आला आहे) आवश्यक आहे अथवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे, असे वाटते. ज्याच्या स्वरूपाचे विवरण यासोबतच्या अनुसूची-दोनमध्ये दिलेले आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींनुसार याद्वारे असे अधिसूचित करण्यात येते की, उक्त जमिनीची उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, प्रस्तावित भूमि संपादनाच्या अनुषंगाने बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे, यासोबत जोडलेल्या अनुसूची तीनमध्ये दिलेली आहेत ;

आणि ज्याअर्थी, सामाजिक परिणाम निर्धारण सारांश यासोबत जोडलेल्या अनुसूची चारमध्ये दिलेला आहे ;

आणि ज्याअर्थी, कलम ४३ च्या पोट-कलम *(१)* अन्वये पुनर्वसन व पुनर्वसाहत या प्रयोजनासाठी नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील यासोबत जोडलेल्या अनुसूची पाचमध्ये दिलेला आहे ;

त्याअर्थी आता, असे घोषित करण्यात येत आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(४)* नुसार कोणतीही व्यक्ती ही अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ते उक्त अधिनियमाच्या प्रकरण-चार खालील कार्यवाही पूर्ण होईल, त्या कालावधीपर्यंत उक्त जमिनीवर कोणताही भार निर्माण करणार नाही ;

परंतु, उक्त जमिनीच्या अथवा त्याच्या भागाच्या मालकाने अर्ज केल्यावर जिल्हाधिकाऱ्यांस विशेष परिस्थितीची कारणे लेखी नमूद करून, अशा मालकास उपरोक्त तरतुदींच्या प्रवर्तनातून सूट देता येईल ;

परंतु आणखी असे की, जर कोणत्याही व्यक्तीने या तरतुदींचे बुद्धिपुरस्सर उल्लंघन केल्यामुळे तिला झालेल्या कोणत्याही हानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्यांकडून भरपाई दिली जाणार नाही ;

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ११ च्या पोट-कलम *(५)* अनुसार, जिल्हाधिकारी, नाशिक, भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१४ (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त नियम" असा करण्यात आला आहे) याच्या नियम १० च्या उप-नियम *(३)* द्वारे विहित केल्याप्रमाणे भूमि अभिलेख्याच्या अद्ययावतीकरणाचे काम हाती घेणार असल्याचे व पूर्ण करणार असल्याचे देखील घोषित करण्यात येत आहे ;

त्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमाखालील जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांस पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची - एक**

**जमिनीचे वर्णन**

**जिल्हा नाशिक, तालुका इगतपुरी, मौजे तळेगाव**

| सर्व्हे नंबर / गट नंबर | | अंदाजित संपादन क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| १८१/१/२ | .. | ० १६ |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव** : नाशिक नगरपरिषद क्षेत्रात सार्वजनिक प्रयोजनासाठी.

**प्रकल्पाच्या कामाचे वर्णन** : इगतपुरी शहराच्या पाणीपुरवठा योजनेकरिता.

**समाजाला होणारे लाभ** : प्राथमिक मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होईल.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे** : लागू नाही.

**अनुसूची - चार**

(सामाजिक प्रभाव निर्धारण अभ्यास करणाऱ्या अभिकरणाने दिलेला)
**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश** : सदरचा मौजे तळेगाव, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक ग्रामपंचायत क्षेत्रात सार्वजनिक प्रयोजनासाठी इगतपुरी गावाच्या पाणीपुरवठा योजनेकरिता आवश्यक आहे.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** प्रशासक म्हणून नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे पदनाम : लागू नाही.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : लागू नाही.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : लागू नाही.

**टीप.**– उक्त जमिनीच्या आराखड्याचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), वैतरणा जलविद्युत प्रकल्प, नाशिक यांच्या कार्यालयात निरीक्षण करता येईल.

**सूरज मांढरे,**
जिल्हाधिकारी, नाशिक.

नाशिक, २९ डिसेंबर २०२१.

---

## उपजिल्हाधिकारी यांजकडून

**वाचले.–** (१) महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २० - २६ फेब्रुवारी २०१४.

(२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील मान्यता जा.क्र. भूसं-२/कावि/३१९/२०२१, दिनांक २२ डिसेंबर २०२१.

**जिल्हा धुळे**

क्रमांक भूसं-१/कावि-९/सन २०२२.— मी, श्रीकुमार चिंचकर, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे जाहीर करीत आहे की, मौजे विखरण (देवाचे), तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील भूसंपादन प्रस्ताव क्रमांक ५/२०११ यात संपादक यंत्रणा स्थापत्य बांधकाम मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ निगम कंपनी मर्यादित, भुसावळ यांचेकडील दिनांक ६ डिसेंबर २०२१ नुसार प्रस्तावित प्रकल्पास होणारा तीव्र विरोध लक्षात घेता व संबंधित यंत्रणेने ज्या जमिनींचा ताबा घेतलेला नाही व जमीन मालकांनी भूसंपादन मोबदला रक्कम घेतलेली नाही असे खालील गट ही भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४८ *(१)* मधील कलम ३६ व भूमि संपादन अधिनियम पुस्तिका (प्रकरण दहा) तरतुदींनुसार भूसंपादन क्रमांक ५/२०११, मौजे विखरण (देवाचे), तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील ५०० मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भूसंपादन प्रस्तावामधून मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची मान्यतेनुसार खालीलप्रमाणे गट वगळण्यात येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ५/२०११**

**जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण**

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| १ | .. | २२१/१ |
| २ | .. | २२१/२ |
| ३ | .. | २२२ |
| ४ | .. | २२३ |
| ५ | .. | २२४ |
| ६ | .. | २२५ |
| ७ | .. | २२७/१ |
| ८ | .. | २२७/२ |
| ९ | .. | २२७/३ |
| १० | .. | २२८ |

प्रस्ताव क्रमांक ५/२०११

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| ११ | .. | २२९ |
| १२ | .. | २३० |
| १३ | .. | २३३/२ |
| १४ | .. | २३७/२-अ |
| १५ | .. | २३७/२-ब |
| १६ | .. | २३७/२-इ |
| १७ | .. | २३८/१ |
| १८ | .. | २३८/२ |
| १९ | .. | २३८/३ |
| २० | .. | २३८/६-अ |
| २१ | .. | २३८/६-ब |
| २२ | .. | २३८/७ |
| २३ | .. | २३९/१/१ |
| २४ | .. | २३९/१/२ |
| २५ | .. | २३९/३ |
| २६ | .. | २३९/४ |
| २७ | .. | २३९/५ |
| २८ | .. | २४०/१ |
| २९ | .. | २४३/१-अ/१ |
| ३० | .. | २४३/१-अ/२ |
| ३१ | .. | २४३/१-अ/३ |
| ३२ | .. | २४३/१-अ/४ |
| ३३ | .. | २४३/१-ब |
| ३४ | .. | २४३/१ |
| ३५ | .. | २४३/२ |
| ३६ | .. | २४५/१ |
| ३७ | .. | २४५/२ |
| ३८ | .. | २४६ |

प्रस्ताव क्रमांक ५/२०११

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| ३९ | .. | २४८/५ |
| ४० | .. | २४९ |
| ४१ | .. | २५०/२ |
| ४२ | .. | २५२ |
| ४३ | .. | २५४ |
| ४४ | .. | २५६ |
| ४५ | .. | २६३/१ |
| ४६ | .. | २६३/५ |
| ४७ | .. | ३३०/१ |
| ४८ | .. | ३३०/२ |
| ४९ | .. | ३३२/१ |
| ५० | .. | ३३२/२ |
| ५१ | .. | ३३४/२ |
| ५२ | .. | ३३६ |
| ५३ | .. | ३३७ |
| ५४ | .. | ३३८/१ |
| ५५ | .. | ३३८/२ |
| ५६ | .. | ३३८/३ |
| ५७ | .. | ३३८/४ |
| ५८ | .. | ३३८/५ |
| ५९ | .. | ३३९ |
| ६० | .. | ३४०/२ |
| ६१ | .. | ३४१ |
| ६२ | .. | ३४२/१ |
| ६३ | .. | ३४२/२ |
| ६४ | .. | ३४३ |
| ६५ | .. | ३४४ |
| ६६ | .. | ३४५ |

**प्रस्ताव क्रमांक ५/२०११**

**जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण**

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| ६७ | .. | २७०/१ |
| ६८ | .. | २७०/२ |

**श्रीकुमार चिंचकर,**
उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन क्रमांक १, धुळे.

धुळे, ४ जानेवारी २०२२.

---

**वाचले.—** (१) महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २० - २६ फेब्रुवारी २०१४.

(२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील मान्यता जा.क्र. भूसं-२/कावि/३१९/२०२१, दिनांक २२ डिसेंबर २०२१.

**जिल्हा धुळे**

क्रमांक भूसं-१/कावि-१०/सन २०२२.— मी, श्रीकुमार चिंचकर, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे जाहीर करीत आहे की, मौजे विखरण (देवाचे), तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील भूसंपादन प्रस्ताव क्रमांक ७/२००९ यात संपादक यंत्रणा स्थापत्य बांधकाम मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ निगम कंपनी मर्यादित, भुसावळ यांचेकडील दिनांक ६ डिसेंबर २०२१ नुसार प्रस्तावित प्रकल्पास होणारा तीव्र विरोध लक्षात घेता व संबंधित यंत्रणेने ज्या जमिनींचा ताबा घेतलेला नाही व जमीन मालकांनी भूसंपादन मोबदला रक्कम घेतलेली नाही असे खालील गट ही भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४८ *(१)* मधील कलम ३६ व भूमि संपादन अधिनियम पुस्तिका (प्रकरण दहा) तरतुदींनुसार भूसंपादन क्रमांक ७/२००९, मौजे विखरण (देवाचे), तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील ५०० मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भूसंपादन प्रस्तावामधून मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची मान्यतेनुसार खालीलप्रमाणे गट वगळण्यात येत आहे.

**प्रस्ताव क्रमांक ७/२००९**

**जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण**

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| १ | .. | २६७ |
| २ | .. | २६९/२ |
| ३ | .. | २७१/१ |

**प्रस्ताव क्रमांक ७/२००९**

**जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण**

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| ४ | .. | २७१/२ |
| ५ | .. | २८३ |
| ६ | .. | २८५/२/१ |
| ७ | .. | २८८/२-ब |
| ८ | .. | २८८/३-अ |
| ९ | .. | २८८/३-ब |
| १० | .. | २९३/३ |
| ११ | .. | २९५/२-ब |
| १२ | .. | २९५/२-ब/२ |
| १३ | .. | २९७/१ |
| १४ | .. | २९७/२ |
| १५ | .. | २९७/३ |
| १६ | .. | २९७/४ |
| १७ | .. | २९८ |
| १८ | .. | २९९ |
| १९ | .. | ३००/१-अ |
| २० | .. | ३०१ |
| २१ | .. | ३०२/१ |
| २२ | .. | ३०२/२ |
| २३ | .. | ३०२/३ |
| २४ | .. | ३०९/१-अ |
| २५ | .. | ३१० |
| २६ | .. | ३१२/२ |
| २७ | .. | ३२२/१-अ |
| २८ | .. | ३२२/१-ब |
| २९ | .. | ३२२/२-अ |
| ३० | .. | ३२२/२-ब |
| ३१ | .. | ३२७/१-अ |

प्रस्ताव क्रमांक ७/२००९

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे विखरण

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| ३२ | .. | ३२७/१-ब/अ |
| ३३ | .. | ३२७/२ |
| ३४ | .. | ३२७/१-अ/२ |
| ३५ | .. | ३२७/१-अ/३ |
| ३६ | .. | ३२७/१-ब |

**श्रीकुमार चिंचकर,**
उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन क्रमांक १, धुळे.

धुळे, ४ जानेवारी २०२२.

---

**वाचले.—** (१) महाराष्ट्र शासन राजपत्र, दिनांक २० - २६ फेब्रुवारी २०१४.

(२) विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील मान्यता जा.क्र. भूसं-२/कावि/३१९/२०२१, दिनांक २२ डिसेंबर २०२१.

**जिल्हा धुळे**

क्रमांक भूसं-१/कावि-११/सन २०२२.— मी, श्रीकुमार चिंचकर, उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक १, धुळे जाहीर करीत आहे की, मौजे मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील भूसंपादन प्रस्ताव क्रमांक ४/२००९ यात संपादक यंत्रणा स्थापत्य बांधकाम मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळ निगम कंपनी मर्यादित, भुसावळ यांचेकडील दिनांक ६ डिसेंबर २०२१ नुसार प्रस्तावित प्रकल्पास होणारा तीव्र विरोध लक्षात घेता व संबंधित यंत्रणेने ज्या जमिनींचा ताबा घेतलेला नाही व जमीन मालकांनी भूसंपादन मोबदला रक्कम घेतलेली नाही असे खालील गट ही भूसंपादन अधिनियम, १८९४ मधील कलम ४८ *(१)* मधील कलम ३६ व भूमि संपादन अधिनियम पुस्तिका (प्रकरण दहा) तरतुदींनुसार भूसंपादन क्रमांक ४/२००९, मौजे मेथी, तालुका शिंदखेडा, जिल्हा धुळे येथील ५०० मे. वॅट सौर ऊर्जा प्रकल्पासाठी भूसंपादन प्रस्तावामधून मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांची मान्यतेनुसार पुढीलप्रमाणे गट वगळण्यात येत आहे.

प्रस्ताव क्रमांक ४/२००९

जिल्हा धुळे, तालुका शिंदखेडा, मौजे मेथी

| अ. क्र. | | गट नंबर |
|---|---|---|
| १ | | २ |
| १ | .. | ११८ |
| २ | .. | १२०/१ |
| ३ | .. | १२१/१-ब |
| ४ | .. | १२१/२ |
| ५ | .. | १२५/१ |
| ६ | .. | १२५/२ |
| ७ | .. | १२५/४ |
| ८ | .. | १२५/५ |
| ९ | .. | १६७/२ |
| १० | .. | १७३/१ |
| ११ | .. | १७३/३ |
| १२ | .. | १७३/४ |
| १३ | .. | १७६/१-अ/१ |
| १४ | .. | १७६/१-अ/२ |
| १५ | .. | १७६/१-२ |
| १६ | .. | १७६/२-१ |
| १७ | .. | १७६/२-२ |
| १८ | .. | १७९/२ |
| १९ | .. | १८४ |

**श्रीकुमार चिंचकर,**
उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन क्रमांक १, धुळे.

धुळे, ४ जानेवारी २०२२.

---

## कार्यकारी अभियंता यांजकडून

### पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक

### ओझरखेड कालवा, उपविभाग क्रमांक २, पिंपळगाव (ब)

### अधिसूचना - ३

**महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा, २००५**

**(*पहा* - कायद्याचे कलम ५.००, ६.००, ७.००)**

**(*पहा* - नियम ३.००)**

क्रमांक पापावि/सिंचन/८१/सन २०२२.– ज्याअर्थी, महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा, २००५, कलम ५.००, ६.००, ७.०० व नियम ३.०० नुसार असा निर्णय झाला आहे की, सहकारी पाणीवापर संस्थांचे जलशास्त्रीय व प्रशासकीय सोईने कार्यक्षेत्र निश्चिती करण्यासाठी मी, राजेश बाबुराव गोवर्धने, कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक खालीलप्रमाणे पाणीवापर संस्थांचे अद्ययावत नकाशाच्या प्रमाणित प्रती जमीनधारक आणि किंवा कब्जेदार यांच्या नावाच्या याद्या ग्रामपंचायत कार्यालय, परमोरी, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक तहसील कार्यालय, दिंडोरी, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक सिंचन शाखा, ओझरखेड धरण, तालुका दिंडोरी, ओझरखेड कालवा उपविभाग, पिंपळगाव (ब), तालुका निफाड, जिल्हा नाशिक व विभागीय कार्यालयाचे सूचना फलकावर माहितीसाठी प्रसिद्ध करीत आहे.

मी, राजेश बाबुराव गोवर्धने, कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक असेही जाहीर करतो की, यापुढे समुचित प्राधिकरणातर्फे कोणत्याही वैयक्तिक जमीनधारकाला किंवा कब्जेदार यांचे जमिनीत पाणी पुरविले जाणार नाही आणि सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन याखाली येणाऱ्या जमिनींचा सर्व धारकांवर व भोगवटधारकांवर पाणीवापर संस्थेमार्फत पाणीपुरवठा करून घेणे बंधनकारक असेल.

या अधिसूचनेमुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस ही अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून तीस दिवसांच्या आत अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक यांचेकडे अपील दाखल करता येईल.

### अनुसूची

### ओझरखेड प्रकल्प

### जगदंबा ठिबक उपसा सिंचन संस्था जिल्हा नाशिक, तालुका दिंडोरी, मौजे परमोरी

| गट क्रमांक १ | | गटाचे एकूण क्षेत्र २ | मंजूर क्षेत्र ३ हे. आर |
|---|---|---|---|
| २८० | .. | २ ३५ | २ ०० |
| १७६/१ | .. | ४ १९ | २ ०० |
| १६५ | .. | १ ४३ | २ ०० |
| २११ | .. | १ १३ | २ ०० |
| २०९ | .. | १ ३२ | १ ६० |
| १९५ | .. | १ ३७ | १ ६० |
| ८०, १७९, १८१ | .. | १ ६२ | २ ०० |
| १९८ | .. | १ ६८ | २ ०० |
| १२६/४ | .. | ३ ५२ | १ ६० |
| २२८ | .. | २ ४० | २ ०० |
| २३५ | .. | १ ८४ | २ ०० |
| १५६-अ, १८९ | .. | १ १३ | १ २० |
| १९१ | .. | ० ७० | १ ४० |
| ९६ | .. | १ ८२ | २ ०० |
| १६५ | .. | १ ४३ | १ ६० |
| १३५ | .. | १ ७७ | २ ०० |
| २४५ | .. | २ १७ | २ ०० |
| २०८ | .. | ७ ४२ | २ ०० |
| २५७ | .. | १ २६ | २ ०० |
| १५७/३ | .. | १ ८० | २ ०० |
| ८९ | .. | ६० ०० | २ ०० |
| १६९ | .. | १ ०५ | २ ०० |
| **एकूण ..** | | **१०३ ४०** | **४१ ००** |

**राजेश बाबुराव गोवर्धने,**
कार्यकारी अभियंता,
पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक.

नाशिक, ७ जानेवारी २०२२.

## लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक

## पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक

### ओझरखेड कालवा उपविभाग, क्रमांक २, पिंपळगाव (ब)

### जगदंबा ठिबक उपसा सिंचन संस्था, मौजे परमोरी, तालुका दिंडोरी, जिल्हा नाशिक

### सभासद यादी

| अ. क्र. | मागणीधारकाचे नाव | गावाचे नाव | गट नंबर | गटाचे एकूण क्षेत्र | मंजूर मागणी क्षेत्र (हे. आर) | | | मंजूर पाणी कोटा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | खरीप | रब्बी | एकूण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | श्री. प्रभाकर किसनराव शेळके चेअरमन/अध्यक्ष/मुख्यप्रवर्तक. | परमोरी | २८० | २ ३५ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| २ | श्री. बाळासाहेब गंगाधर काळोगे | परमोरी | १७६/१ | ४ १९ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| ३ | श्री. बाळासाहेब सजन काळोगे | परमोरी | १६५ | १ ४३ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| ४ | श्री. संजय दौलत शिवले | परमोरी | २११ | १ १३ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| ५ | श्री. कचरू किसनराव काळोगे | परमोरी | २०९ | १ ३२ | ० ८० | ० ८० | १ ६० | २४२८ |
| ६ | श्री. विलासराव देवराम काळोगे | परमोरी | १९५ | १ ३७ | ० ८० | ० ८० | १ ६० | २४२८ |
| ७ | श्री. नंदु गणपत निकम | परमोरी | ८०, १७९, १८१ | १ ६२ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| ८ | श्री. केशवराव जगन्नाथ शिवले | परमोरी | १९८ | १ ६८ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| ९ | श्री. नामदेव रामचंद्र शिंदे | परमोरी | १२६/४ | ३ ५२ | ० ८० | ० ८० | १ ६० | २४२८ |
| १० | श्री. माधवराव मुरलीधर शिरसाठ | परमोरी | २२८ | २ ४० | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| ११ | श्री. बाबुराव अनाजी दिघे | परमोरी | २३५ | १ ८४ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| १२ | श्री. रघुनाथ काशिनाथ जाधव | परमोरी | १५६-अ, १८९ | १ १३ | ० ६० | ० ६० | १ २० | १८२१ |
| १३ | श्री. भाऊसाहेब बळवंत जाधव | परमोरी | १९१ | ० ७० | ० ७० | ० ७० | १ ४० | २१२५ |
| १४ | श्री. सोमनाथ वसंत काळोगे | परमोरी | ९६ | १ ८२ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| १५ | सौ. मनिषा मधुकर काळोगे | परमोरी | १६५ | १ ४३ | ० ८० | ० ८० | १ ६० | २४२८ |
| १६ | सौ. वर्षा सुनिल ढेमसे | परमोरी | १३५ | १ ७७ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| १७ | श्री. शरद भगवंत जमधडे | परमोरी | २४५ | २ १७ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| १८ | श्री. विनायक धोंडी काळोगे | परमोरी | २०८ | ७ ४२ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| १९ | श्री. अरूण पंढरीनाथ शिवले | परमोरी | २५७ | १ २६ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| २० | मथुराबाई भाऊराव काळोगे, सुरेखा संजय काळोगे. | परमोरी | १५७/३ | १ ८० | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| २१ | श्री. माधव नामदेव निगळ | परमोरी | ८९ | ६० ०० | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| २२ | श्री. गणपत निवृत्ती काळागे | परमोरी | १६९ | १ ०५ | १ ०० | १ ०० | २ ०० | ३०३५ |
| | | | **एकूण..** | **१०३ ४०** | **२० ५०** | **२० ५०** | **४१ ००** | **६२२२४** |

**राजेश बाबुराव गोवर्धने,**
कार्यकारी अभियंता,
पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक.

नाशिक, ७ जानेवारी २०२२.

## प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांजकडून

### अधिसूचना

क्रमांक आस्था/६०/८२१९/सन २०२१.– दिवाणी नियम पुस्तिका भाग १, १९८६ च्या परिच्छेद क्रमांक ६९९ आणि ७०२ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक सन २०२२ या वर्षासाठी नाशिक जिल्हा न्यायिक विभागाकरिता खालीलप्रमाणे सुट्ट्या जाहीर करीत आहेत.

(१) सर्व रविवार

(२) सर्व दुसरे व चौथे शनिवार

### सन २०२२ सालातील सुट्ट्यांची यादी

| अ. क्र. | सुट्टीचे नाव | दिवस / वार | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | गणराज्य दिन | बुधवार | २६ जानेवारी २०२२ |
| २ | छत्रपती शिवाजी महाराज जयंती | शनिवार | १९ फेब्रुवारी २०२२ |
| ३ | महाशिवरात्री | मंगळवार | १ मार्च २०२२ |
| ४ | धुलिवंदन | शुक्रवार | १८ मार्च २०२२ |
| ५ | गुढीपाडवा | शनिवार | २ एप्रिल २०२२ |
| ६ | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती | गुरुवार | १४ एप्रिल २०२२ |
| ७ | गुड फ्रायडे | शुक्रवार | १५ एप्रिल २०२२ |
| ८ | रमजान ईद | मंगळवार | ३ मे २०२२ |
| ९ | बुद्ध पौर्णिमा | सोमवार | १६ मे २०२२ |
| १० | मोहरम (ताजिया) | मंगळवार | ९ ऑगस्ट २०२२ |
| ११ | स्वातंत्र्य दिन | सोमवार | १५ ऑगस्ट २०२२ |
| १२ | गोकुळ अष्टमी | शुक्रवार | १९ ऑगस्ट २०२२ |
| १३ | पोळा | शुक्रवार | २६ ऑगस्ट २०२२ |
| १४ | श्रीगणेश चतुर्थी | बुधवार | ३१ ऑगस्ट २०२२ |
| १५ | अनंत चतुर्दशी | शुक्रवार | ९ सप्टेंबर २०२२ |
| १६ | दसरा | बुधवार | ५ ऑक्टोबर २०२२ |
| १७ | दीपावली अमावस्या | सोमवार | २४ ऑक्टोबर २०२२ |
| १८ | दीपावली (अतिरिक्त) | मंगळवार | २५ ऑक्टोबर २०२२ |
| १९ | दीपावली (बलिप्रतिपदा) | बुधवार | २६ ऑक्टोबर २०२२ |
| २० | दीपावली (अतिरिक्त) | गुरुवार | २७ ऑक्टोबर २०२२ |
| २१ | दीपावली (अतिरिक्त) | शुक्रवार | २८ ऑक्टोबर २०२२ |
| २२ | दीपावली (अतिरिक्त) | शनिवार | २९ ऑक्टोबर २०२२ |

**उन्हाळी सुट्टी**

सोमवार, दिनांक ९ मे २०२२ ते रविवार, दिनांक ५ जून २०२२ पर्यंत (दोन्ही दिवस धरून)

**हिवाळी सुट्टी**

सोमवार, दिनांक २६ डिसेंबर २०२२ ते शनिवार, दिनांक ३१ डिसेंबर २०२२ पर्यंत (दोन्ही दिवस धरून)

कार्यालये उन्हाळी व हिवाळी सुट्टीत **(SUMMER AND WINTER VACATION)** चालू राहतील.

**खालील सुट्ट्यांचे दिवशी रविवार येत असल्यामुळे सदर दिवशी सुट्टी दर्शविलेली नाही.**

| अ. क्र. | सुट्टीचे नाव | दिवस / वार | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्रीराम नवमी | रविवार | १० एप्रिल २०२२ |
| २ | महाराष्ट्र दिन | रविवार | १ मे २०२२ |
| ३ | बकरी ईद | रविवार | १० जुलै २०२२ |
| ४ | गौरी पूजन | रविवार | ४ सप्टेंबर २०२२ |
| ५ | महात्मा गांधी जयंती | रविवार | २ ऑक्टोबर २०२२ |
| ६ | ईद-ए-मिलाद | रविवार | ९ ऑक्टोबर २०२२ |
| ७ | नाताळ | रविवार | २५ डिसेंबर २०२२ |

**टीप.**— (१) दिनांक ७ मे २०२२ रोजी २ रे राष्ट्रीय लोकअदालतीचे कारणास्तव सुट्टी राहील.

(२) सन २०२२ या वर्षात सर्व प्रकारच्या सुट्ट्या वगळता २३९ कार्यालयीन कामकाजाचे दिवस आहेत.

**अभय सो. वाघवसे,**
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
नाशिक.

नाशिक, १५ डिसेंबर २०२१.

---

## BY PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE

No. B-2/Admn/6/2022.– The following Judicial Officers in the District, have been permitted to avail Winter off / Winter Vacation as mentioned against their names in Col. No. 3 respectively, during Winter Vacation for the Year 2021 *i.e.* from 24th December 2021 to 31st December 2021 (Both days includsive).

| Sr. No. | Name and Designation of the Judicial Officers | Period of Winter off / Winter Vacation enjoyed | Remarks |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Shri. Adwait Dattatray Kshirsagar, District Judge-2 and Additional Sessions Judge, Dhule. | 24/12/2021 to 31/12/2021 | -- |
| 2 | Shri. Mirza Javed Jaffer Baig, District Judge-4 and Additional Sessions Judge, Dhule. | 24/12/2021 to 31/12/2021 | -- |
| 3 | Shri. Harun Abusaheb Mulla, District Judge-6 and Additional Sessions Judge, Dhule. | 24/12/2021 to 31/12/2021 | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | Shri. Vilas Vasantrao Gaikwad,<br>District Judge-7 and<br>Additional Sessions Judge, Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 5 | Shri. Nikhil Ajitkumar Gupta,<br>Joint Civil Judge, Senior Division,<br>Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 6 | Shri. Santosh Hanumantrao Garad,<br>2nd Joint Civil Judge, Senior Division,<br>Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 7 | Shri. Pavan Harivijay Bansod,<br>4th Joint Civil Judge, Senior Division,<br>Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 8 | Shri. Rijwan Usman Shaikh,<br>5th Joint Civil Judge, Senior Division,<br>Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 9 | Dr. Shri. Dipak Umesh Dongare,<br>Secretary,<br>District Legal Service Authority, Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 10 | Shri. Vaibhav Vasantrao Kulkarni,<br>Chief Judicial Magistrate, Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 11 | Smt. Shruti Nilesh Gangawal-Shah,<br>3rd Joint Civil Judge, Junior Division<br>and Judicial Magistrate, First Class, Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 12 | Shri. Milind Mahadu Nikam,<br>4th Joint Civil Judge, Junior Division,<br>and Judicial Magistrate, First Class, Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 13 | Smt. Archana Tulshiram Jagtap,<br>5th Joint Civil Judge, Senior Division,<br>Dhule. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 14 | Shri. Kailas Tryambak Adhayake,<br>Civil Judge, Junior Division and<br>Judicial Magistrate, First Class, Dhule. | 25/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |
| 15 | Shri. Raju Bhaskar Dole,<br>Joint Civil Judge, Junior Division and<br>Judicial Magistrate, First Class, Sakri. | 24/12/2021<br>to<br>31/12/2021 | -- |

**MOHAMMAD RIYAZODDIN HAFIZODDIN,**
Principal District and Sessions Judge,
Dhule.

Dhule, 1st January 2022.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.